# उद्या होणारा सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळा स्थगित; नवी तारीख लवकरच जाहीर होणार!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं. दैनिक
महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

उद्या होणारा सत्यशोधक पुरस्कार वितरण सोहळा काही कारणास्तव पुढे ढकलण्यात आला आहे. आयोजकांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, हा ऐतिहासिक सोहळा रद्द केलेला नसून फक्त स्थगित करण्यात आला आहे. लवकरच या कार्यक्रमाची नवी तारीख जाहीर करण्यात येणार असून, पुरस्कार वितरण सोहळा यापूर्वीपेक्षा अधिक भव्य आणि दिमाखदार पद्धतीने घेण्यात येईल, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. सत्यशोधकांच्या विचारांचा जागर अजून मोठ्या प्रमाणात व्हावा आणि जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक तसेच सांस्कृतिक कार्यकर्त्यांचा गौरव व्हावा, या हेतूने दरवर्षी हा कार्यक्रम आयोजित केला जातो. मात्र काही तांत्रिक कारणांमुळे यावर्षी नियोजित तारखेला कार्यक्रम होऊ शकणार नाही. त्यामुळे जिल्ह्यातील समाजबांधव, मान्यवर आणि कार्यकर्त्यांनी थोडी प्रतिक्षा ठेवावी, असे आयोजकांनी आवाहन केले असून, लवकरच नवीन तारीख जाहीर करण्यात येणार आहे.

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३२८ ■ शनिवार दि.१६ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 328 ■ Saturday Dt. 16 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीडमध्ये अजितदादांचा गुप्त डाव! स्वातंत्र्यदिनी जिल्ह्याच्या राजकारणाची भाकरी फिरवली, लवकरच होणार मोठा स्फोट?

## शरद पवारांना मोठा धक्का बसणार? आ.संदिप क्षीरसागर अजित पवारांच्या संपर्कात; सत्तासमीकरणात उलथापालथ होण्याची चिन्हं!

## आ.संदिप क्षीरसागरांना आपल्या गळाला लावण्याचे अजितदादांचे प्रयत्न तेजीत; जिल्ह्यात चर्चांना उधाण?

बीड । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी घेतल्यापासून राजकीय घडामोडींनी वेग पकडला आहे.तिथे अजित पवारांनी एकापाठोपाठ राजकीय आणि प्रशासकीय पातळीवर धाडसी निर्णय घेतल्याचं दिसून येत आहे. अजित पवार यांनी संतोष देशमुख प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या धनंजय मुंडेंना तगडे पर्याय शोधण्यासाठी पावले उचलल्याचीही चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर बीडमध्ये राजाभाऊ मुंडे, बाबरी मुंडे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश झाल्याचे बोलले जात आहे. अशातच आता बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनाही गळाला लावण्यासाठी अजित पवारांनी जोरदार प्रयत्न सुरू केल्याचे दिसून येत आहे.

पालकमंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर पहिल्यांदाच अजित पवार हे बीडमध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. यानंतर त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या भेटी घेतल्या. यावेळी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी अजित पवार यांना पाया पडून नमस्कार केला. यानंतर अजित पवारांच्या दुसऱ्या बाजूला आमदार क्षीरसागर बसल्यानं राजकीय वर्तुळात चर्चा जोर धरू लागल्या आहेत. अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्यात दिवसेंदिवस जवळीकता वाढत असल्याचं बोललं जात आहे.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीत असूनही आमदार संदीप क्षीरसागर यांनी काही दिवसांपूर्वीच शहरात अजित पवारांचे आभार मानणाऱ्या आशयाचे पोस्टर लावले होते. या त्यांच्या बॅनरबाजीमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असतानाच अजित पवारांच्या ६ ते ७ ऑगस्ट रोजीच्या दोन दिवसीय बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावेळीही क्षीरसागर यांनी दोन्ही दिवस उपस्थिती लावली होती.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरण उचलून धरताना धनंजय मुंडे यांच्याविरोधात बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी भाजप आमदार सुरेश धस यांच्या खांद्याला खांदा लावून पुढाकार घेतल्याचं दिसून आलं होतं. खरंतर राष्ट्रवादी फुटीच्या अगोदर संदीप क्षीरसागर आणि धनजंय मुंडे एकमेकांचे घनिष्ठ मित्र होते.पण अजित पवारांच्या बंडावेळी क्षीरसागर यांनी शरद पवारांची साथ दिली होती.

आता अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचं पालकमंत्री स्विकारल्यापासून आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडून त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच अजित पवारही एक ना अनेक प्रकरणांमुळे अडचणीत आलेल्या धनंजय मुंडेंना तगडा पर्याय म्हणून आमदार संदीप क्षीरसागरांवर गळ टाकण्यासाठी डाव टाकण्याची शक्यता आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या काळापासून सोबत असलेल्या राजाभाऊ-बाबरी या मुंडे पिता-पुत्रांनी पुढे पंकजा मुंडे यांनाही साथ दिली. परंतु विधानसभा निवडणुकीत राजाभाऊ मुंडे यांनी माजलगावमधून अपक्ष निवडणूक लढवल्यामुळे पंकजा मुंडेंसोबतचे त्यांचे संबंध बिघडले.

धनंजय मुंडे-पंकजा मुंडे या बहिण भावासाठी विशेषत: पंकजा मुंडे यांच्यासाठी हा मोठा धक्का असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली होती.







## नशा मुक्त बीड अभियान

बीड : पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून नशा मुक्त बीड अभियान राबविण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने आज बीड पोलिस दलातर्फे मोटारसायकल रॅली काढून जनजागृती करण्यात आली.






## बस प्रवासादरम्यान महिलेच्या पर्सवर डल्ला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राखीपोर्णिमा आटोपून बीडला परत जाणाऱ्या एका महिलेच्या पर्सवर एस.टी. बसमधील गर्दीचा फायदा घेत तीन अनोळखी महिलांनी हात साफ करत दागिने व रोख रक्कम असा सुमारे ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लता बालासाहेब साळवे (वय ४०, रा. धानोरा रोड, बीड) या रक्षाबंधनानिमित्त माहेरी अंबाजोगाई येथे आल्या होत्या. दिनांक १२ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास त्या अंबाजोगाई येथून बीडकडे जाण्यासाठी छत्रपती संभाजीनगर मार्गावरील एस.टी. बसमध्ये चढल्या. बसमध्ये

▶ पान २ वर

## धारूरच्या शिवस्मारकाचे सुशोभीकरण करा; सकल मराठा समाज वतीने दिले निवेदन

धारूर । प्रतिनिधी



धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सुशोभीकरण व संरक्षित कठडे सह इतर समस्या सोडवण्यासाठी धारूर येथील सकल मराठा समाज बांधवांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश गायकवाड यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. यावेळी मोठ्या संख्येने सकाळ मराठा समाज बांधव उपस्थित होते. धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील महाराजांच्या स्मारकाचे सुशोभीकरण करण्यासाठी अनेक दिवसांपासून मागणी होती. या मागणीची दखल घेण्यात यावी म्हणून १४ ऑगस्ट गुरुवार रोजी धारूर येथील सकल मराठा समाजाचे बांधवांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक महेश गायकवाड यांना निवेदन देऊन छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या आश्वारुढ पुतळयास हार घालण्यासाठी कायमस्वरुपी हायड्रोलिक सिडी, चौक परिसरात लाईटची व आकर्षक रोषनाई, संरक्षण जाळी, पाण्याचे कारंजे चालु करुन स्मारक परिसरात वाहान, बॅनर लावण्यावर निर्बंध घालावेत तसेच परिसर दररोज स्वच्छ ठेवण्यात येऊन कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे यावेळी धारूर सकल मराठा समाजाकडून करण्यात आली आहे. यावेळी मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

## श्री. मंगलनाथ मल्टिपल अर्बन निधी घोटाळ्यात फरार व झालेल्या आरोपींची संपत्ती जप्त करण्यात यावी

### मुख्यमंत्र्यांकडे निवेदन सादर

गेवराई । प्रतिनिधी

श्री. मंगलनाथ मल्टिपल अर्बन निधीच्या अध्यक्ष केशव शेषनारायण पंडित यांच्यासह, मॅनेजर व नवीन संस्था चालू झाल्यापासून आधीचे व तात्कालीन क्लार्क इतर गोल्ड व्हॅल्युवर प्रशांत सुभाष शेलार या सर्वांनी कोटी रूपयाचा घोटाळा करुन चेअरमनला फरार केले आहे. या प्रकरणातील २३ मार्चपासून चेअरमनला व संचालक व गोल्ड व्हॅलीवर याला पोलीसांनी अटक न केल्यामुळे सर्व



आरोपींची संपत्ती जप्त करून सर्व खातेदार यांची रक्कम परत करण्याची कार्यवाही करावी तसेच दोषी आरोपींना कठोर शासन करावे, असे निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कार्यवाही करणेसाठी खातेदार यांनी पाठविले आहे. सविस्तर वृत्त असे की श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी अर्बन निधीच्या एका शाखेत खातेदार ठेविदार यांनी कोटींचा घरात टक्के व्याजदराने गुंतवणूक केली आहे. दरम्यान २३ मार्च रोजी अचानक शाखा बंद पडल्याने खातेदार ठेविदारात एकच खळबळ उडाली. आता आपली जमा रक्कम परत कधी मिळणार या विवंचनेत खातेदार, ठेविदार सापडले आहेत. नागरिकांनी जिवन संघर्षातून जमा

▶ पान २ वर

# दैव बलवत्तर म्हणून पुलावरून पाण्यात वाहून गेलेले राजाभाऊ टिंगरे सुखरूप

## नागरिकांची पुलाची उंची वाढवण्याची मागणी




बीड । प्रतिनिधी

सात्रा पोथरा, मुर्शदपूर घाट ता.जि. बीड येथे १५ ऑगस्ट, शुक्रवार रोजी सकाळी ७:१५ वाजता एक जीवघेणी घटना घडली. पोथरा गावातील रहिवासी राजाभाऊ रामचंद्र टिंगरे हे काशेश्वरी देवीच्या दर्शनासाठी जात असताना पाण्याच्या जोरात पुलावरून वाहून गेले. काल दुपारी तीन वाजल्यापासून परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे खडकी व पोथरा - मुर्शदपूर घाट येथील तलाव भरले. परिणामी दोन्ही नद्यांना पुराचे पाणी मोठ्या प्रमाणात आले व पाणी दोन्ही पुलांवरून वाहू लागले. दोन्ही पुलांची उंची कमी असल्याने पाण्याचा वेग आणि दाब अतिशय जास्त होता. कदाचित याचा अंदाज राजाभाऊ टिंगरे यांना नसल्याने ते पुलाच्या मध्यापर्यंत गेले; मात्र अचानक पाय घसरून ते पाण्यात वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच गावातील नागरिक नदीकाठी जमले आणि शोधमोहीम सुरू झाली. जवळपास तीन-चार तासांच्या प्रयत्नांनंतर राजाभाऊ टिंगरे ऊसाच्या शेतातील गाळामध्ये अडकलेले सापडले. ग्रामसेवक संजय सानप यांच्या उपस्थितीत गावकऱ्यांनी त्यांना बाहेर काढून सुखरूप घरी पोहोचवले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे.

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना गावकऱ्यांनी तात्काळ या घटनेची माहिती दिल्यानंतर तहसीलदार शेळके यांनी सूत्र फिरवली. मंडळ अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्राम महसूल यांना सूचना देऊन तात्काळ त्या ठिकाणी पाठविले. तसेच संबंधित दुर्घटनाग्रस्त यांच्या तब्येतीची विचारपूस केली, त्यांना दवाखान्यात नेण्याचा सल्ला दिला आणि गावकऱ्यांना दूरध्वनीद्वारे धीर दिला. त्यांच्या या कृतीमुळे गावकऱ्यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे व ग्रामपंचायत अधिकारी संजय सानप यांचे आभार मानले.

यावेळी गावातील सरपंच अमोल लंबाटे, उपसरपंच दिलीप हावळे व इतर सहकाऱ्यांनी त्यांच्या कुटुंबियांना दिलासा दिला. या घटनेनंतर नागरिकांनी शासनाकडे दोन्ही पुलांची उंची वाढवण्याची मागणी केली आहे. अशाप्रकारच्या घटना टाळण्यासाठी पुलांचे मजबुतीकरण, पाण्याचा इशारा देणारी यंत्रणा, जनजागृती शिबिरे, तात्पुरते सुरक्षा बॅरिकेड्स आणि तत्काळ मदत पथके अशी उपाययोजना राबवण्याची गरज व्यक्त केली आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की नदी वा नाल्यांवरून पाणी वाहत असताना कोणत्याही परिस्थितीत पुलावरून जाण्याचा प्रयत्न करू नये आणि प्रशासनाकडून दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी पावसाळ्यात अनावश्यक प्रवास टाळण्याचे आणि चेतावणींचे पालन करण्याचे आवाहन केले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी नागरिकांना नदी - नाल्यांजवळ मुले व वृद्धांना जाऊ न देण्याचे आणि धोक्याची माहिती तात्काळ कळवण्याचे आवाहन केले. ही घटना वेळेत मदत मिळाल्याने सुखरूप संपली असली, तरी भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने पायाभूत सुधारणा होणे अत्यावश्यक असल्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# जालन्यात रंगला गोर बंजारा तिज महोत्सव

## ना.पंकजाताई मुंडे यांची उपस्थिती ठरली आकर्षणाचा केंद्रबिंदू



जालना । प्रतिनिधी

सामाजिक एकतेचा संदेश देणाऱ्या गोर बंजारा समाजाच्या तिज महोत्सव शहरातील सोरटी नगर येथे आजपासून सुरू झाला. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी सकाळी विशेष हजेरी लावल्याने या महोत्सवाला अधिक रंगत आली. पारंपरिक वेषभूषेत सहभागी झालेल्या बंजारा महिलांसोबत पंकजाताई मुंडे याठिकाणी रमल्या, त्यामुळे त्यांची उपस्थिती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

आमदार राजेश राठोड यांच्या विशेष आमंत्रणावरून जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी सोरटी नगर, अंबड चौफुली येथे या उत्सवाला भेट दिली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि जल्लोषात त्यांचे स्वागत करण्यात आले. पारंपरिक वेशभूषा, पारंपरिक खाद्यपदार्थ आणि रंगीबेरंगी झांजपथकांनी संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. बंजारा महिलांचे पारंपरिक लेंगा-चोळी परिधान करत साजरे केलेले तिज नृत्य यामध्ये काहीकाळ पंकजाताई मुंडे रममाण झाल्या. पंकजाताईंनी महोत्सवात सहभाग घेतल्यावर उपस्थित बंजारा बांधवांशी आत्मियतेने संवाद साधला. यामुळे बंजारा समाज बांधवांचा उत्साह द्विगुणित झाला होता.

त्यांनी बंजारा समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे आणि एकतेचे कौतुक केले. गोर बंजारा समाजाच्या संस्कृतीतील ही तिज परंपरा ही आपली अस्मिता आहे. समाजाच्या प्रेमाने आणि उत्साहाने मन आनंदून गेले अशी भावना यावेळी पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली. यावेळी पारंपरिक पामडी देवून त्यांचा सत्कार करण्यात आला.



प्राथमिक आरोग्य पथक आणि सबसेंटर सिरसमार्ग तालुका गेवराई जिल्हा बीड येथे स्वातंत्र्य दिवस साजरा करताना वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सूरज नवनाथ बनसोडे, सामुदायिक आरोग्य अधिकारी डॉक्टर अविनाश बहीर आणि सर्व कर्मचारी तसेच शिक्षक आणि शाळकरी विद्यार्थी.

# काळे झेंडे दाखवणार म्हणताच कार्यकर्ते पोलीस ठाण्यात स्थानबद्ध

## मोडकळीस आलेल्या शाळांच्या दुरुस्तीसाठी निधी न मिळाल्याने आंदोलनकर्त्यांवर कारवाई



बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या तब्बल ९४ शाळांना इमारतच नाही आणि ३८१ शाळांमधील ६०७ वर्गखोल्या मोडकळीस आल्या आहेत. शिक्षक व विद्यार्थी जीव मुठीत धरून शिक्षण घेत असताना काही शाळांमध्ये छत कोसळून विद्यार्थी जखमी होण्याच्या घटना घडल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी शिक्षण विभागाने १४ कोटी ८५ लाखांचा प्रस्ताव सादर केला तरी निधी मंजूर झाला नाही. मोडकळीस आलेल्या सरकारी शाळा ढासळल्या, छप्पर कोसळलं, शासन प्रशासनाला कधी जाग येणार? काळे झेंडे दडपले पण शाळांचा प्रश्न दडपणार कसा? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी वारंवार निवेदने व आंदोलन करूनही ठोस निर्णय न झाल्याने अखेर १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री अजित पवारांना काळे झेंडे दाखवण्याचा इशारा दिला. यानंतरच पोलिस प्रशासनाने डॉ. ढवळे यांना नोटीस बजावत लिंबागणेश पोलीस चौकीत स्थानबद्ध केले.

**लोकशाही हक्क दडपण्याचा प्रयत्न : डॉ. गणेश ढवळे**

स्वातंत्र्यदिनी लोकांच्या प्रश्नांसाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करणे हा नागरिकांचा हक्क आहे. आंदोलने दडपण्याचा आणि आंदोलनकर्त्यांना पोलीस स्टेशनमध्ये थांबवण्याचा प्रयत्न हा निषेधार्ह आहे. जर पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवणे अपमानास्पद वाटत असेल, तर त्यांनी तातडीने शाळांसाठी निधी द्यावा, अशी भूमिका डॉ. ढवळे यांनी स्पष्ट केली.

# 'विकास केलाच नाही' मग आढावा कसला? क्या विकास पागल हो चुका है कहां गया ये विकास?

## लोकप्रतिनिधींना बीड शहर बचाव मंचाचा संतप्त सवाल



बीड । प्रतिनिधी

कोणी लोकप्रतिनिधी विकासाचे आढावे घेत फिरतोय. विकास केलाच नाही मग हे आढावेच कसले...? आम्हा जनतेला काही कळायला मार्ग नाही. विकासाचे आढावेच घ्यायचेआहेत ना तर या मग एकदा जमिनीवर, बीड शहराच्या गल्लोगल्ली लोकांच्या दारोदार एकदा फिराच... आढावा नक्कीच भेटेल. आढावा भेटेल तुमच्या सगळ्या क*** कर्तुतीचा, तुमच्या सगळ्या चाळीस वर्षाच्या कारकिर्दीचा... विकास घरी झोप घेऊन स्वप्नात होत नसतो.. आजकाल विकास स्वप्नात तर येत नाहीये ना.. काय झाल आहे या विकासाला.. कुठे गेला आहे हा विकास.. लोकप्रतिनिधींच्या स्वप्नात तर जाऊ लागला नाही ना.. असं तर होत नाही ना रात्री स्वप्नात विकास केला आणि सकाळी उठून आढावे घेत फिरू लागले आहेत... अवघडच झाले आहे या विकासाचे... शोधूनही सापडत नाहीये... कहां गया है ये विकास'...? आज कल क्या करता है और कहा रहता है ये विकास..?? क्या विकास सचमुच पागल हो चुका है.. मुझे सभी आवाम की तरफ से इन लोकप्रतिनिधींयो को पूछना है कि ये आढावे लेते वक्त, ये पागल हो चुका विकास कहीं मिला क्या..?? हम सब को भी आके देखना है ये विकास होता कैसा है, दिखता कैसा है, रहता कहा पे है, जाता कहा पे है, और आता कहा से है और किसके किसके सपनो मे आता है...!

खरंचच आढावे घेणाऱ्यांना बीड शहर बचाव मंचाच्या वतीने व सर्व जनतेच्या वतीने एकच प्रश्न आहे कुठे गेला आहे हा विकास.. आढावे घेताना तरी सापडला का... काय खरंचच विकास पागल' झाला आहे.. सच मे विकास' पागल हो चुका है..? आढावे घेताना तरी हा कुठे भेटला का..? आढावे घेताना विकासाला भेटून तुम्ही जर धन्य झाला असाल तर आम्हालाही सांगा.. त्याची भेट घ्यायची आहे आणि आम्हालाही धन्य व्हायचे आहे.

जे लोकप्रतिनिधी जनतेची दिशाभूल करून, व फक्त दिशाभूल करण्यासाठीच विकासाचे आढावे घेत फिरत आहेत त्या सगळ्यांना माझे सर्व जनतेच्या वतीने एकच आव्हान आहे की लोकांच्या दारोदारी, या शहरामध्ये गल्लोगल्ली फिरा आणि विकासाचा आढावाच घ्या. सर्व जनता आढावा देण्यासाठी डोळ्यात तेल' घालून तुमची वाट पाहत आहे. मग तुम्हाला नक्कीच कळेल विकास' क्यूं पागल हो रहा है.... एकदा आढावा घ्यायला याच.. आणि होऊन जाऊ द्या दुधाचे दूध पाण्याचे पाणी.. किती खरं आणि किती खोटं.. होऊन जाऊ द्या एकदा जनतेच्या दरबारात आमने-सामने विकास' कुठे आहे..?? आढावा घेत फिरणाऱ्या लोकप्रतिनिधीने हा विकास कुठे व कधी केला होता हे आपल्या सगळ्यांना बघायला जायचे आहे मग येणार ना सगळेजण विकास' पाहायला..??

# संघर्ष व त्यागाने मिळालेले स्वातंत्र्य जपले पाहिजे : वाय.एस.अन्सारी

## महिला महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

गेवराई । प्रतिनिधी

इंग्रजी सत्तेपासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी असंख्य भारतीयांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. त्यामुळे अमूल्य असे हे स्वातंत्र्य आपण सर्वांनी जपले पाहिजे, असे प्रतिपादन वाय.एस.अन्सारी यांनी केले. ते महिला महाविद्यालयातील स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण, श्रीमती रोहिणी लाखुटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई येथे भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे मा. वाय.एस.अन्सारी यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, १५० वर्षांची इंग्रजी राजवट उलथून टाकण्यासाठी असंख्य भारतीयांनी प्राणांचे बलिदान दिले आहे. कित्येकांनी तुरुंगवास भोगला आहे. त्यामुळे आज आपण स्वातंत्र्यात जगत आहोत. आपण सर्वांनी हे स्वातंत्र्य जपले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीने दिलेली मूल्य प्रत्यक्षात जीवनात उतरवली पाहिजेत. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण यांनी ही वर्तमान काळातील स्वार्थ, भ्रष्टाचार पासून मुक्ति मिळवण्यासाठी लोकशाही जीवनमूल्ये आत्मसात करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. यावेळी 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाच्या वतीने कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. शिवाजी दिवाण यांनी सर्वांना 'तंबाखू मुक्ति' ची शपथ दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संगिता आहेर यांनी केले तर प्रा. रामहरी काकडे यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थीनी यांची उपस्थिती होती.



राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी चे प्रदेश प्रवक्ता भागवत तावरे साहेबानी मित्र हाफिज मंसूर साहब यान्ना मुस्लिम वेलफेर असोसिएशन चे उलेमा जिला अध्यक्ष पदी निवड झाल्या बद्दल शुभेच्छा दिल्या व हाफिज मंसूर साहेबानी ही भागवत तावरे यान्ना राष्ट्रवादी कांग्रेस प्रदेश प्रवक्ता पद मिळल्या बदल सत्कार केला. यावेळी उपस्थित सय्यद साजेद सलीम खदीर पिजांरी बाबा भाई मैनु शेख ऐजाज भाई आफान शेख हामिद चौउस व सर्व मित्र परिवार.

# गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या एस.पीं.च्या निषेधात माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांचे आंदोलन




बीड । प्रतिनिधी

१५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या विशेष प्रसंगी, माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक अनोखा निषेध नोंदवला. त्यांनी गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधीक्षकाचा फोटो गळ्यात अडकवून निषेध केला. यावेळी त्यांची पत्नीही उपोषणात सहभागी झाल्या.

गेल्या अनेक दिवसांपासून विविध पद्धतींनी आंदोलन करण्यात येत असूनही न्याय न मिळाल्यामुळे वाघमारे यांनी हे पाऊल उचलले आहे. बीड तालुक्यातील शिवनी येथील गट नंबर ६६२ या ठिकाणी ते गायरान शेती करत आहेत आणि त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अन्नधान्य पिकवून होतो. अलीकडे त्यांच्या घरातील शेड पाडून त्यांच्यावर अन्याय झाल्याची घटना घडली आणि याबाबत संबंधित आरोपींवर कारवाई नाही झाल्याने त्यांचा निषेध करण्यासाठी वाघमारे यांनी हा उपाय केला. मारहाणीचे व्हिडिओ उपलब्ध असूनही कारवाई न झाल्याने त्यांनी पोलीस अधीक्षकांचा फोटो गळ्यात घालून न्यायाची मागणी केली. या घटनेद्वारे त्यांनी गुन्हेगारांवर कारवाई करण्याची आणि गुन्हेगारांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

# विभाजन विभिषीका चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ.स्वरूपसिंह हजारी यांच्या हस्ते संपन्न




धारूर । प्रतिनिधी

धारूर येथे येथे १४ ऑगस्ट १९४७ दिवशी झालेल्या भारत देशाच्या विभाजनादरम्यान झालेल्या विभीषिकेचे चित्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते, विद्यार्थी व नागरिकांसाठी दिवसभर हे चित्र प्रदर्शन हनुमान मंदिर, रंगार गल्ली, धारूर शहरात ठिकठिकाणी आयोजित केले होते येथे तरी सर्व विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी फाळणी दरम्यानचे चित्र बघून निरीक्षण केले व यावेळेस उपस्थितीना डॉ. स्वरूपसिंह हजारी यांनी विद्यार्थ्यांना या चित्र प्रदर्शनाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. हर घर तिरंगा कार्यक्रम निम्मित तिरंगा झेंड्याचे सर्व विद्यार्थी, शिक्षक बांधव व कार्यकर्तांना वितरण करण्यता आले होत. या वेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगरध्यक्ष डॉ.स्वरुपसिंह हजारी, नगरसेवक रूपेश चिद्रवार, माजी तालुकाध्यक्ष ॲड.बालासाहेब चोले, भाजपा तालुकाध्यक्ष संदीप काचगुंडे, भाजपा शहरध्यक्ष दत्ता भाऊ धोत्रे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष गणेश बडे, भाजपा युवा मोर्चा शहरध्यक्ष एड. मोहन भोसले, सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी, खरीदी विक्री संचालक रामप्रभु मुंडे, युवा नेते गोविंद तोंडे, राधा कृष्ण चोले, दिलीप सानप सर, सर्व शिक्षक बांधव कार्यकर्ता मान्यवर उपस्थित होते.

# बाबासाहेब सराफ यांच्या प्रयत्नांना, उपोषणकर्त्यांच्या मागणीला यश

# हक्काच्या जागेवर मिळाला ताबा



धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील मौजे रुई धारूर येथील ग्रामपंचायत हद्दीतील राहत्या घराची जागा ३३ थाय ३३ हि पी.टी.आर. ला नोंद असलेली जागा प्रत्यक्ष कमी असून सदरील जागेवर संबंधितांनी अतिक्रमण केले होते. अतिक्रमण काढण्यासाठी सय्यद जम्प्रोही शेख करीम, शेषराव नारायण पवार व्यक्तीनी केलेले अतिक्रमण काढण्यासाठी धारूर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले होते. शिवसेना तालुकाप्रमुख बाबासाहेब सराफ यांनी उपोषणकर्ते व प्रशासनामध्ये मध्यस्थी उपोषण स्थगित करण्यात आले.

तहसिल प्रशासनाने, ग्रामपंचायत कार्यालयाने लगच मागणी मान्य केली व उपोषणकर्त्यांना त्यांच्या जागेचे मोजमाप करून जागेवर ताबा मिळवून दिला आहे. बाबासाहेब सराफ यांच्या प्रयत्नाला, उपोषणकर्त्याच्या मागणीला यश आले आहे. अनेक वेळा तक्रारी अर्ज निवेदन करूनही ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती कार्यालयाकडून जाणून बुजून दुर्लक्ष करत होते. त्यामुळे संबंधित उपोषणकर्त्ये दि.१४ तहसील कार्यालय समोर उपोषणास बसले होते. सराफ यांच्या मध्यस्थीनंतर उपोषण दि.१५ रोजी स्थगित करण्यात आले. संबंधिताकडून सदरील जागेवर करण्यात आलेले अतिक्रमण जागेचे मोजमाप करून काढण्यात आलेले आहे.

पान १ वरून...

## बस प्रवासादरम्यान महिलेच्या पर्सवर डल्ला

मोठी गर्दी असल्याने त्या उभ्या राहिल्या. त्यावेळी त्यांच्या पायाजवळ एक अनोळखी महिला बसली होती, तर दोन महिला उभ्या होत्या.

लोखंडी सावरगाव येथे या तिन्ही महिला गर्दीतून उतरत असताना लता साळवे यांना संशय आला. त्यांनी लगेचच आपली पर्स तपासली असता त्यातील एक तोळ्याचे झुंबर कानातले, पाच ग्रॅम वजनाचे मनी मंगळसूत्र व पाच हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ९५ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेलेला आढळला. त्यानंतर त्यांनी होळ येथे उतरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दिली. पोलिसांनी अनोळखी तिन्ही महिलांविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार प्रवीण उल्ले करीत आहेत.

## श्री. मंगलनाथ मल्टिपल अर्बन निधी घोटाळ्यात फरार

रक्कम १२ टक्के व्याजदराने गुंतवणूक केली. शाखा अचानकच बंद पडल्याने ती रक्कम परत मिळण्याकरिता ठेविदार स्वतः संघर्ष करीत आहे. शहरातील इतर बँकेच्या तुलनेत अतिरिक्त म्हणजे १२ टक्के व्याजदराचे आमीष दाखवीत एका थाटात राजकीय नेत्यांच्या व संत महंत मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन व शुभारंभ करुन श्री. मंगलनाथ मल्टिपल अर्बन निधींची शाखा स्थापन करुन त्या विविध शाखेत खातेदार व ठेवीदारांनी कोटींच्या घरात रक्कम जमा केलीय. रक्कम व्याजासह परत मिळण्याकरिता शाखेत धाव घेतली असता शाखा अचानकच बंद पडल्याने एकच खळबळ उडाली होती. श्री. मंगलनाथ मल्टिपल निधी अर्बन निधीचे अध्यक्ष व संचालकांनी ३ कोटींची आपली फसवणूक करुन संचालक व बँकेतील कर्मचाऱ्यांनी संगनमत करून पळ काढला आहे. पोलीसांना अद्याप एकही आरोपी अटक न करता आल्यामुळे या घोटाळा प्रकरणातील फरार चेअरमन केशव पंडित व गोल्ड व्हॅल्युवर प्रशांत शेलार यांची संपत्ती जप्त करून खातेदार व ठेवीदार यांना परत करून दोषीना कठोर शासन करावे असे निवेदन मुख्यमंत्र्यांना खातेदार ठेवीदार आदींनी पाठविले आहे.

# विक्रम देणगी : भायाळा ग्रामस्थांची श्री क्षेत्र भगवानगडाला ४ कोटी ७ लाख रुपये देणगी जाहीर

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**भगवानगड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे भायाळा (ता.पाटोदा जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या संपूर्ण आकडेवारीची एकूण गोळाबेरीज ही ४ कोटी ७ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



## गटशेती प्रीमियर लिग स्पर्धा मध्ये सहभागी गावातील शेतकऱ्यांना फळ झाडाचे वाटप



**धारूर । प्रतिनिधी**

पाणी फाऊंडेशन आयोजित गटशेती प्रीमियर लीग स्पर्धा – २०२५ स्पर्धेत सहभागी झालेल्या गटांना सेट्रिज व पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अंबा, चिकू, मोहगणी, साग, जांभूळ, मोसंबी आदी झाडांची मोफत रोपे वाटप करण्यात येत आहेत. धारूर तालुक्यातील जायभायवाडी, व्हरकटवाडी, शिंगणवाडी, मुखेड, आम्ला, खोडस, निमला, सुरनारवाडी, कासारी, सोनिमोहा येथे स्पर्धेत सहभागी गटातील शेतकऱ्यांना ४७६४ अंबा रोपे वाटप करण्यात आली.

या वेळी गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्ट दिसत होता. धारूर तालूक्यात गटशेती प्रिमीयर लिग स्पर्धे २०२५ मध्ये सहभागी तालूक्यातील गावातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी फळबाग लागवडी साठी पाणी फाऊंडेशन सातत्याने मार्गदर्शन करत आहे. यासाठी लागवडीपूर्वी खड्डे खोदून त्यामध्ये शेणखत, ट्रायकोड्रामा, बायोमिक्स, लिंबाचा पाला, कुजलेला पालापाचोळा टाकून तयारी करण्यात आली. सर्व खड्डे जेसीबी च्या साह्याने १ मीटर खोल व १ मीटर रुंद घेण्यात आले. या गावातील शेतकऱ्यांना ४७६४ वृक्षाचे रोपाचे वितरण करण्यात आले कार्यक्रमा वेळी पानी फाऊंडेशनचे मराठवाडा समन्वयक संतोष शिनगारे यांनी हे वृक्ष लागवडी बद्दल मार्गदर्शन केले. यावेळी तालुका समन्वयक नितीन पाटोळे, सिद्धार्थ कवडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# झटपट श्रीमंत होण्याचा मोह शेकडा लोकांच्या अंगलट आला

## लाखावर नव्हे कोटीच्या घरात अनेकांना गंडा घातल्याचे प्रकरण समोर

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील पारोडी सह अनेक गावातील लोकांनी आठ ते दहा रूपये टक्का या प्रमाणे आजवर पैसे घेतले. पण मार्च महिन्यापासून गुंतवणूक केलेल्या पैशाची टक्केवारी सोडा, पण मुद्दलही देण्यास टाळाटाळ झाली. आणि फसवणूक झालेला शेतकरी पुढे आला आणि यातील घोटाळा समोर आणि इनफिनाईट बीकॉन फायनान्सियाल कंपनीमध्ये गुंतवणूक केलेल्या ३ लाख २० हजार रुपये सीससे व ट्रेडदा ईन्वेस्टमेंट प्रा.लि. या ब्रोकींग फर्म कंपनीच्या सीससे व ट्रेडदा ईन्वेस्टमेंट प्रा.लि. या ब्रोकींग फर्म कंपनीच्या खात्यावर वर्ग केले. १ एप्रिल २०२५ च्या पुर्वी आयएफ ग्लोबल ट्रेडींग लिमिटेड या पोर्टलवर ही फसवणुक झाल्याची रोहिदास पोपट काळे रा.पारोडी ता.आष्टी या शेतकऱ्यांने ९ ऑगस्ट रोजी अंभोरा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या लालसेपोटी आर्थिक गंडा घातल्याचे समोर आले असले तरी लक्ष्मीच्या लळ्यात, आरगड आली गळ्यात असे आता बोलले जात आहे. शेकडो शेतकऱ्यांना याचा फटका बसला असून पोलिस तपासात आणखी आकडा वाढण्याची शक्यता आहे.

**सुपा, अहिल्यानगर, श्रीगोंदा पाठोपाठ आष्टीत गुन्हा दाखल**

याच कंपनीने जाळ्यात अडकून अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील लोकांची फसवणूक केली आहे. वीस दिवसांपुर्वी याच कंपनीवर सुपा, अहिल्यानगर, श्रींगोदा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. दोन दिवसापूर्वी आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. कंपनीच्या अकरा लोंकाविरूध्द अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणाच्या तपासाची व्याप्ती मोठी असल्याने आर्थिक गुन्हे शाखेकडे हा तपास वर्ग करण्यात येणार असल्याचे अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी सांगितले.

# ह.भ.प.शांतिब्रम्ह महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यबद्दल प्रदीप खाडे यांचा सन्मान

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

शिक्षणातुन समाजप्रगती साधणारे, सामाजीक, धार्मिक कार्याच्या माध्यमातुन आपल्या नेतृत्वगुणांचा समाजाला परिसस्पर्श लाभलेले व्यक्तीमत्व म्हणुन ओळख असणारे व्यक्तिमत्व कै.रामभाऊ (आण्णा) खाडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष, नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप शिवाजीराव खाडे यांचा झोला येथे ह.भ.प.प्रभाकर झोलकर महाराज यांच्या आयोजनाखाली सुरू असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज ७५० वा जन्मोत्सव व मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात ह.भ.प. शांतिब्रम्ह महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यबद्दल प्रदीप खाडे यांचा श्री पांडुरंगाची प्रतिमा देऊन हृदय सत्कार करण्यात आला.

गंगाखेड तालुक्यातील झोला (पिंपरी) सद्गुरू सेवा संस्थान गोदातट येथे दि.१३ ते १७ ऑगस्ट दरम्यान श्री संत मोतीराम महाराज व श्री संत जनाबई यांच्या कृपा आशीर्वादाने श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सव व मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा (सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सव) निमित्त अखंड रामकृषण हरी नाम जप ५ दिवस सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. ह.भ.प. पू. प्रभाकर नाना महाराज झोलकर यांच्या आयोजक व मार्गदर्शनाखाली भव्य दिव्य सोहळा होत आहे. या सोहळ्यात नामवंत किर्तनकाराचे किर्तन व विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात शैक्षणीक क्षेत्रात क्रांती करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन दिले. हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच नेहमीच धार्मिक कार्यात सहभागी असते.



आपल्या जन्मगावी कांदेवाडी येथे दरवर्षी कै. शिवाजीराव खाडे त्याचे वडीलाच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांची किर्तनसेवा, अंबाजोगाई येथील श्री केदारनाथ मंदिरासाठी शेड उभारत या मंदिरात येणार्या भाविकांसोबतच मंदिरात आयोजीत धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांना उपयुक्त अशी सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. याबरोबरच संगम येथे अन्नदान, देवदहिफळ येथील खंडोबा मंदिरात आकर्षक फुलांची सजावट. याबरोबरच प्रभाकर महाराज झोलकर यांच्या सद्गुरु आश्रमास सढळ हाताने मदत अशा धार्मिक कार्यात तन–मन–धनाने सहभाग असतो. प्रदिप खाडे यांनी ह शिक्षण, सामाजिक, धार्मिक कार्यात अग्रेसर रहात कार्य केलेले. अशा सर्व गुणसंपन्न सुसंस्कृत व समाजकारणाची तळमळीने ओढ असलेल्या व अनेकांसाठी आदर्श बनलेल्या प्रदीपराव खाडे यांचा भक्तीमय वातावरणात ह.भ.प. शांतिब्रम्ह महादेव महाराज चाकरवाडीकर व ह.भ.प.प्रभाकर झोलकर महाराज यांनी पंढरपूर येथील श्री विठ्ठलाची प्रतिमा भेट देऊन सन्मान करून कौतुक केले. यावेळी नामदेव गिरी महाराज, वैजनाथ भोसले, रामराजे तोडकर, ज्ञानेश्वर मगर, प्रफुल्ल कोमटवार, बालासाहेब साखरे, काजळे सर व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

**कौतुकाची थाप..**

ह.भ.प. शांतिब्रम्ह महादेव महाराज चाकरवाडीकर व ह.भ.प.प्रभाकर झोलकर महाराज यांनी केलेला सन्मान व कौतुकाची थाप म्हणजे माझ्यासाठी खूप प्रेरणादायी आहे. यामुळे मला शैक्षणिक व सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील आणखी जोमाने काम करण्यासाठी ऊर्जा मिळाली असल्याची प्रतिक्रिया कै.रामभाऊ (आण्णा) खाडे सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष, नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदीप खाडे यांनी दिली.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरवन पिंपरी आमच्या गावातील शाळेतील चिमुकल्याने दहीहंडी साजरी केली. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक वृंद सर्वांना खूप खूप शुभेच्छा.

# भागूजीराव ढेकळे विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए. एस. हे होते. स्वातंत्र्य दिनानिमित्त शाळेचे ध्वजारोहन प्राचार्य थिटे ए.एस. यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच रितेश साबळे, उपसरपंच विकास चौधरी, गिन्यानदेव चौधरी, बळीराम साबळे, राम भांडवलकर, लक्ष्मण दाभाडे, सुनिल घोडके, अंगद मुळे, अविनाश चौधरी, अवधुत पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.



यप्रसंगी बोलताना प्राचार्य थिटे ए. एस. म्हणाले की, भारत देश स्वातंत्र झाला त्यास आज ७८ वर्ष पुर्ण होत आहेत. भारताला स्वातंत्र मिळवण्यासाठी अनेक लहानथोर स्वातंत्रविरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, बाबू गेनू यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त झाला. गेल्या ७८ वर्षात आपल्या देशाने सर्वच क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी पर्यवेक्षक आर. डी. रांजवण, क्रिडा शिक्षक घोरड आर. डी. यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्रीराम जाधव यांनी केले तर सुत्रसंचालन चंद्रशेखर जामकर यांनी केले. शेवटी प्रा. अरूण कळासे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# झाडे लावा, झाडे जगवा, जिल्हा परिषद शाळा समृद्ध करा : सरपंच राज पाटील

**वडवणी । प्रतिनिधी**

प्रयास फाउंडेशन मुंबई तथा गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड व लढा दुष्काळाशी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पहिली ते आठवी येथील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना मोफत वही पेन पेन्सिल या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. याप्रसंगी या कार्यक्रमाला उपस्थित लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा तीगावचे विद्यमान सरपंच राज पाटील, म्हणाले आहेत की वडवणी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आम्ही विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करणार आहोत, व वृक्ष लागवड करणार आहोत असे मत यावेळी सरपंच यांनी म्हटले.

या कार्यक्रमाला मंचावर उपस्थित, देवगाव चे प्रथम नागरिक सरपंच रामेश्वर सुरवसे, आदर्श देवगाव चे युवा पत्रकार अंकुश गवळी, दैनिक विकासनामा या वृत्तपत्राचे मुख्य संपादक फपाळ सर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश गवळी, शिक्षण प्रेमी भूषण सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गिरगुणे, माजी सरपंच सखाराम सुरवसे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक हाडुळे सर, लांडगे सर, सानप सर, गवळी सर, गाढवे मॅडम, पवार मॅडम, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.

# स्वातंत्र्यासाठी क्रांतिवीरांनी मोठी किंमत मोजली याचे सर्व नागरिकांनी भान ठेवावे : वाघ

**बीड । प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लाखो क्रांतिविरांना मोठी किंमत मोजावी लागली, कित्येकांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली आहे. एकंदरीतच देशाला मिळालेले स्वातंत्र्य हे लाख मोलाचे आहे. याचे प्रत्येक नागरिकांनी भान ठेऊन वागावे. या स्वातंत्र्याचा गैरफायदा न घेता सर्वांचं स्वातंत्र्य अबाधित ठेवून समाजात सलोखा निर्माण करत देशाचे उज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी शिक्षकांच्या पाठोपाठ पालकांनी आणि समाजातील प्रत्येक नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजे असे मत शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सौ सुदामतीताई वाघ यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहणा नंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव श्री नामदेवराव वाघ, गावातील प्रतिष्ठित नागरिक गणेश कदम, दिलीप कदम, पांडुरंग शेंडगे, प्रवीण तोडकर, विक्रम कदम, दत्तात्रय शेंडगे, दादाराव काळे, सर्जेराव भडगळे, बालाजी कवठेकर, रामगुडे यांच्यासह दत्तात्रय चव्हाण (मुख्याध्यापक), आत्माराम वाव्हळ सर आदी उपस्थित होते.





बीड शहरापासून जवळच असणाऱ्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला हिंदवी स्वराज्याचे निर्माते राजाधिराज श्रीमंत योगी शिवछत्रपती श्री शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महापुरुषाच्या प्रतिमा पूजनांतर संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामातीताई वाघ यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांचे पाहुण्यांचे शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागतानंतर शाळेतील काही निवडक विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाबद्दल आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक तथा प्रसिद्ध उद्योजक श्री गणेश आबा कदम यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यानंतर शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ सुदामाती ताई वाघ यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

या वेळी बोलताना सौ सुदामतीताई वाघ म्हणाल्या की, भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक क्रांतिकारी, स्वातंत्र्यवीरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. लो.टिळक, म.गांधी, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस या महापुरुषांच्या नेतृत्वाखाली अनेक जण स्वातंत्र्याच्या लढाईत धारातीर्थी पडले, लाखो देशभक्तांनी देशासाठी आपलं बलिदान दिल आहे. त्यांच्या या बलिदाना नंतर १५ ऑगस्ट १९४७ साली ब्रिटिश राजवटीतून भारत स्वतंत्र झाला. भारतातील सांस्कृतिक तसेच धार्मिक विविधतेमुळे भारत जेव्हा स्वतंत्र झाला. तेव्हा अनेकांनी भारत हा देश एकसंध राहणार नाही असे भाकित वर्तवले होते. परंतु विविधतेत एकता हेच भारताचे वैशिष्ट्य ठरले आणि आज ७९ वर्षाच्या स्वातंत्र्यतोत्तर वाटचालीत भारताच्या एकात्मतेला कुठेही तडे गेले नाहीत. भारताने तंत्रज्ञान, विज्ञान, शेती, शिक्षण असा विविध क्षेत्रात प्रगती केली. या प्रगतीच्या जोरावर आज भारत महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत आहे. भारत ज्या वेगाने प्रगती करत आहे त्या किंबहुना त्याच्या दुप्पट वेगाने भारत विविध समस्यांनी वेढला गेला आहे. तेव्हा प्रश्न पडतो की खरच आपण स्वतंत्र आहोत का? स्वातंत्र्य मिळून ७९ वर्ष झाली. काही भागात अद्याप मूलभूत सुविधा मिळत नाहीत ही अत्यंत खेदाची बाब आहे. एकंदरीत सुजलाम सुफलाम भारत देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी आपणास क्रांतिकांचे योगदान कायम ध्यानात ठेवले पाहिजे. या देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लाखो क्रांतीविरांना मोठी किंमत मोजावी लागली त्यामुळे मिळालेले स्वातंत्र्य हे लाख मोलाचे आहे याचे सर्वांनी भान ठेऊन वागले पाहिजे. लाखो शहीदांच्या बलिदाना नंतर मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा न घेता सर्वांचं स्वातंत्र्य अबाधित ठेवाव. त्याच बरोबर समाजात सलोखा निर्माण करून देशाचे उज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी शिक्षकांच्या पाठोपाठ पालकांनी आणि समाजातील प्रत्येक नागरिकांनी प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन सौ. सुदामतीताई वाघ यांनी शेवटी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आत्माराम वाव्हळ यांनी तर आभार दत्तात्रय चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त भरपावसात तळेगाव ग्रामपंचायत येथे अवयदान प्रतिज्ञा : नितीन महुवाले

**बीड । प्रतिनिधी**

आज दिनांक १५ ऑगस्ट २०२५ वार शुक्रवार रोजीग्रामपंचायत तळेगाव येथे प्रथम ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला सरपंच माननीय श्रीमती अश्विनीताई उद्धव घोलप यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाला नंतर आरोग्य विभाग प्राथमिक आरोग्य केंद्र राजुरी नवगण उपकेंद्र तळेगावच्या वतीने आरोग्य सेवक नितीन महूवाले यांनी पुढील अवयवदान प्रतिज्ञा घेतली समस्त ग्रामपंचायत सदस्य कर्मचारी वर्ग व गावकरी मंडळी यांच्या उपस्थितीत अवयवदान प्रतिज्ञा– माणुसकी हा माझा धर्म आहे.



पीडितांच्या व गरजूंच्या जीवनात आनंद हीच माणुसकीची खरी शिकवण आहे अशी माझी श्रद्धा आहे अवयवदानामुळे गरजू रुग्णांच्या जीवनात आनंद फुलविणे शक्य होते तसेच मुत्यूपंथाला लागलेल्या व्यक्तिला नवा जन्म देता येतो त्यामुळे सर्वात मोठे पुण्यकर्म आहे यावर माझा विश्वास आहे. मी प्रतिज्ञा करीत आहे की माझ्या शरीरात जे जे अवयव दुसऱ्या मानवाच्या जीवनात आनंद फुलू शकतील अशा अवयवावर माणुसकीचा पहिला हक्क व अधिकारी असेल माझ्या अवयवाचा अशा माणुसकीच्या पुण्य कार्यासाठी उपयोग झाला पाहिजे असा माझा आग्रह आहे. माझ्या पुढील पिढ्यांनी या आग्रहाचा मान राखावा म्हणून त्यांना सतत स्मरण देत राहील आणि पुढील पिढ्यावर असेच संस्कार घडवित यासाठी मी प्रयत्नशील राहीन अशा प्रकारची प्रतिज्ञा नितीन महुवाले यांनी घेतली व सर्वांनी प्रतिसाद दिला. उपस्थित मान्यवर ग्रामसेवक अचूतराव चाळक, तलाठी श्रीमती खेडकर मॅडम, सरपंच श्रीमती अश्विनीताई उद्धव घोलप, उपसरपंच अशोक मस्के, सदस्य गणेश मुंजाळ, श्रीराम घोलप, सत्यवान घोलप, कर्मचारी प्रकाश साबळे, शिक्षक वर्ग मा सरवदे, आरोग्य विभाग डॉ. तनुजा शेटे, आ सेविका श्रीमती कदम, आ सेविका श्रीमती शेलार, तसेच अंगणवाडी सेविका, मदतनिस आदी मान्यवर उपस्थित होते.



# १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त शालेय साहित्य वाटप : अक्षय गवळी, बाळासाहेब मायकर

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा, पिंपळगाव (ना) येथे विद्यार्थ्यांना १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त शालेय साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना वही, पेन, उजळणी पुस्तक घेऊन स्वातंत्र्य दिन साजरा केला.

आयोजक अक्षय गवळी ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब मायकर युवा नेते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर शाळेचे मुख्याध्यापक विजय आडे, काटुळे, सरपंच कोमल ताई मायकर, अंगणवाडी सेविका सुनीता गवळी, गोविंद मायकर, गोरख काकडे, रामेश्वर खाडे, अरुण मस्के, कृष्णा तोंडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



**बीड :** जालना रोड येथे न्यू करीम ऑटोमोबाईल्स अँड करीम इंटरप्राईजेस चे नवीन जागेत स्थलांतरित झाले, त्यानिमित्त उद्घाटन समारंभास उपस्थित राहून शुभेच्छा देताना फहीम इनामदार, असलम पटेल, तोफिक पटेल, अहमद पटेल, पोलीस बॉईज असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष रवींद्र शिनगारे.

# मांजरा धरण ८० टक्के भरले

## जिल्हाधिकाऱ्यांनी दिला नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड-लातुर आणि उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील १७२ गिवांची तहान भागवणाऱ्या मांजरा धरणात आज १६ ऑगस्ट रोजी सकाळपर्यंत ७९.६३% टक्यांच्याही पुढे पाणी संचय झाला असुन धरणक्षेत्रात पाण्याचा ऐवा मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या ही वर्षी धरण पुर्णक्षमतेने भरले जाण्याचीआणि धरणाची दरवाजे उघडण्याची वेळ प्रशासनावर लवकरच येईल अशी आशा निर्माण झाली आहे.

यावर्षी जुन महिन्यापासूनच दमदार पावसास सुरुवात झाली असल्यामुळे मराठवाड्यात सर्वच मोठी धरणे ओसांडुन वाहत आहेत. मांजरा धरणाच्या वरच्या बाजुस नदीच्या उगमस्थानापासुन १४ बंधारे आणि लहानमोठे असे २६ तलाव निर्माण करण्यात आल्यामुळे अलिकडील कांही वर्षात मांजरा धरण भरण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशाही परिस्थितीत मांजरा तग धरुन उभे राहण्याचा प्रयत्न करतेयच! अलिकडे पर्जन्यमानात झालेली कमी आणि मोठ्या पुढाऱ्यांची पाणी ओढण्यासाठी निर्माण झालेली जीवघेणी स्पर्धा बीड-लातुर आणि धाराशिव जिल्ह्यातील १७२ गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या या गावातील माणसांची, जनावरांची, पक्षांची, पिकांची तहान भागवणाऱ्या मांजरा धरणाचा गळा घोटण्याचा प्रयत्न करीत आहेत. आणि या १७२ गावातील लोकप्रतिनिधी, छोटे-मोठे पुढारी, सामाजिक कार्यकर्ते हा सर्व प्रयत्न अतिशय थंड डोक्याने पहात आहेत.



### सतत पडणाऱ्या पावसामुळे दिला इशारा

मांजरा धरण प्रवण क्षेत्रात गेली चार दिवसांपासून सतत पडत असणारा पाऊस, धरण क्षेत्रात साठलेला पाणीसाठा आणि आगामी चार दिवसांत पडणाऱ्या पावसाचा दिलेला इशारा लक्षात घेता गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजी नगर विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी लातुर पाटबंधारे विभाग क्र.१ यांना सुचना देवून १५ ऑगस्ट २०२५ रोजी एक कार्यालयीन आदेश काढून नदीकाठच्या गावांना व नदीकाठी राहणाऱ्या लोकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

यासर्व अडचणींचा मुकाबला करीत मांजरा नदी आणि धरण आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासर्व अडथळ्यांच्या स्पर्धेमुळे आता मांजरा भरण्यास विलंब लागत आहे. आज १६ ऑगस्ट २०२५ रोजी मांजरा धरणात ७९.६३ टक्यापेक्षा ही जास्त पाणी साठा जमा झाला आहे. सध्या चार-पाच दिवस सतत पाऊस सांगितला असल्याने या नक्षत्रात चांगला पाऊस पडतो आहे. शिवाय कमी दाबाचा निर्माण झालेल्या पट्ट्यामुळे आपल्या भागात या चार दिवसांत सांगितलेल्या मोठ्या पावसाचा आपल्याला लाभ होणार अशी चिन्हे अधिक आहेत. याशिवाय नेहमी तारणारा परतीचा पावूस ही अजून शिल्लक आहेच. या सर्व बाबींचा सकारात्मक विचार केला तर येत्या काही दिवसात मांजरा धरण भरल्याची व धरणाचे दरवाजे उघडल्याची गोड बातमी आपणास ऐकायला मिळेल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही.

मांजरा धरणाची संपुर्ण पाणी साठवण क्षमता २२४.०८३ दलघमी एवढी असून आज धरणात १८८.०४६ दलघमी पाणी साठा जमा झाला आहे. म्हणजे धरण पुर्णक्षमतेने भरण्यासाठी अगदी थोड्या दलघमी पाणी साठ्याची आवश्यकता आहे. आज मांजरा नदीचा प्रवाह लक्षात घेतला तर प्रति सेकंदास ४८८.४० घनमीटर एवढे पाणी धरणक्षेत्रात जमा होत आहे. धरणक्षेत्राच्या कँचमेंट एरीयात आणखी जोराचा पाऊस झाला तर हे प्रमाण वाढु ही शकेल. मांजरा नदीची क्षमता प्रति सेकंदास १०२.११९ घनमीटर एवढे पाणी धरणात आणण्याची आहे. त्यामुळे आजची परिस्थिती लक्षात घेतली तर धरण भरण्यासाठी कसल्याही प्रकारची अडचण येईल असे वाटत नाही.

आमदार संदीप क्षीरसागर यांच्या कार्यालयाजवळ खड्ड्यांचा विसर

# पावसात सरपते सह नागरिकांचा बेशरम झाड लावून निषेध

**बीड । प्रतिनिधी**




बीड शहरातील राष्ट्रवादी भवन ते अक्सा मशीद चौक हा मुख्य रस्ता मोठमोठ्या खड्ड्यांनी अडथळ्यांनी भरला असून, वाहनधारक, पादचारी, विद्यार्थी आणि रुग्ण दररोज प्रचंड त्रास सहन करत आहेत. या गंभीर स्थितीबाबत निवेदन ईमेलद्वारे आमदार संदीप क्षीरसागर आणि खासदार बजरंग सोनवणे यांना पाठवले गेले, तरीही कोणतीही दखल घेतली गेली नाही.

दोन दिवसांपूर्वी आमदार संदीप क्षीरसागर यांनी नगरपरिषदेत नवनियुक्त मुख्याधिकाऱ्यांसह आढावा घेतला, तरीही स्वतःच्या कार्यालयाजवळील रस्त्यांकडे दुर्लक्ष केले. यामुळे नागरिकांना प्रतिकात्मक निषेध करावा लागला. आज स्वातंत्र्य दिनानिमित्त मिलिंद सरपते यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी पावसात भिजत बेशरम झाड लावून आंदोलन केले. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, पालकमंत्री अजित पवारांनी तातडीने रस्त्याची पाहणी करून डांबरीकरण करावे; अन्यथा पुढील दौऱ्यांमध्ये काळे झेंडे दाखवून निषेध, मतदानाचा बहिष्कार आणि मुख्याधिकारी हटाव - बीड शहर बचाव या घोषणाखाली व्यापक जनआंदोलन उभे राहील.

संदीप क्षीरसागर यांच्या कार्यालयाजवळील रस्त्यांचा विसर फक्त असुविधा नाही, तर जनप्रतिनिधींच्या निष्क्रियतेचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. निवेदन ईमेलद्वारे सूचित केले गेले तरी दखल घेतली गेली नाही; परिणामी नागरिकांना प्रत्यक्ष निषेध करावा लागला. हा प्रकार फक्त रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नाही, तर प्रशासन आणि जनप्रतिनिधींच्या जबाबदारीबाबत जागरूकतेचा अभाव अधोरेखित करतो. पावसात भिजत नागरिकांचा निषेध त्यांच्या धैर्याचे, सुरक्षिततेसाठी केलेल्या संघर्षाचे आणि सरकारच्या निष्क्रियतेविरुद्ध केलेल्या प्रतिकाराचे प्रतीक आहे. स्थानिक प्रशासन आणि पालकमंत्र्यांनी त्वरित रस्त्याचे डांबरीकरण आणि सुरक्षा उपाययोजना सुनिश्चित करणे गरजेचे आहे. अन्यथा नागरिकांचा रोष वाढेल आणि जनआंदोलन टाळणे अशक्य ठरेल.या निषेधात सहभागी नागरिकांमध्ये आगा खान, गफार खान, मुजीब सर, अल्ताफ शेख, वायभट, सय्यद मुस्ताक, जफर खान यांचा समावेश होता.

# वाघोरा येथील जलजीवन कामाची चौकशी करण्यासाठी जि.प. समोर आमरण उपोषण

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील मौजे वावरा येथील जल जीवन मिशन अंतर्गत काम न करता बोगस बिल उचलल्या प्रकरणी येथील जिल्हा परिषद समोर वाघोरा येथील ग्रामस्थांनी आंदोलन केले. माजलगाव तालुक्यातील मोजे वाघोरा येथील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत गुत्तेदार जे.पी. डावकर यांनी अधिकाऱ्यांशी संगणमत करून काम न करता कोट्यावधी रुपयाचे बोगस बिल उचलले आहे.

वाघोरा गावांतर्गत तसेच दलित वस्ती, दर्गा व तांडा अंतर्गत कसल्याही प्रकारची पाईपलाईन न करता जुन्याच पाईपलाईनला कनेक्शन देत बिलाच्या मोजमाप पुस्तके दाखवत कोट्यावधीचे बोगस बिले उचलण्यात आली. सदरील काम हे मागील एक ते दीड वर्षापासून बंद पडलेल्या आहे. मात्र ७० टक्के बिल उचलण्यात आले. त्यामुळे सदरील अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून गुत्तेदारस व त्यांच्या एजन्सीला काळया यादीत टाकण्यात यावे या मागणीसाठी ग्रामस्थांनी १५ ऑगस्ट रोजी जि प बीड समोर आमरण उपोषण सुरू केले. मात्र पंधरा दिवसात चौकशी करू, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी हे आंदोलन थांबवले. पंधरा दिवसाचे चौकशी नाही झाली तर यापेक्षाही उग्र आंदोलन करण्याचा इशारा वाघोरा येथील ग्रामस्थांनी दिला आहे.




# गंगाभारती पतसंस्थेच्या अपहार प्रकरणी ठेवीदारांची अजित दादांकडे धाव - ठेवीदारांना दिलासा, दोषींवर कारवाईचे आश्वासन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील गंगाभारती महाराज ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था येथे झालेल्या कोट्यवधींच्या अपहार प्रकरणामुळे ठेवीदारांच्या हातचे पैसे अडकले असून, ठेवीदारांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, व्यवस्थापक व संचालक मंडळ मोकाट फिरत असून, संबंधितांवर गुन्हा दाखल असला तरी दोन वर्षांपासून ते फरार आहेत. यामुळे बीड पोलिसांच्या निष्क्रियतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

१३ मार्च २०२४ रोजी मांजरसुंबा पिंपळवाडी शाखेत अपहार प्रकरणी नेकनुर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. ००४५/२०२४ दाखल करण्यात आला होता. करचुंडी, लिंबागणेश, मांजरसुंबा, चौसाळा व बीड पिंपळवाडी या शाखांतील ठेवीदारांचे सुमारे ५ ते ६ कोटी रुपये अडकलेले आहेत. या गंभीर प्रकरणात ठेवीदारांचे हक्क अबाधित राहावेत यासाठी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली ठेवीदारांनी स्वातंत्र्य दिनादिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा दिला होता. यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची ठेवीदारांसह हरिओम क्षीरसागर यांनी भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले.



निवेदनातील मुख्य मागण्या गुन्हा दाखल असलेल्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी. संचालक व शाखाधिकारी यांच्यावरही गुन्हे दाखल करावेत. ठेवीदारांचे पैसे परत करण्याची तातडीने कार्यवाही करावी. प्रशासकांनी निष्क्रीय राहू नये; प्रभावी कारवाई करणे आवश्यक. शासकीय लेखा परीक्षकांनी संस्थेच्या सर्व शाखांचा लेखापरीक्षण अहवाल तात्काळ तयार करून निबंधक कार्यालयात दाखल करावा. या वेळी अजित दादांनी ठेवीदारांच्या भावना लक्षात घेऊन त्वरित कार्यवाहीचे आश्वासन दिले. तसेच ठेवीदारांच्या हक्कासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल, असा दिलासा त्यांनी दिला.

# दिव्यांग बांधवाचा ५ % निधी वाटप करण्यासाठी हनुमंत तोंडे यांचे अन्नत्याग उपोषण

**धारूर । प्रतिनिधी**




दिव्यांग बांधवांचा किल्ले धारूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत मधील ५ टक्के निधी वाटप करण्यासाठी प्रहार च्या वतीने दि.१३-०८-२०२५ रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

हे निवेदन किल्ले धारूर येथील तहसिल कार्यालया मार्फत जिल्हाधिकारी यांना पाठवण्यात आले.

दिव्यांग बांधवाचा ५ टक्के निधी विविध योजनासाठी वापरला जातो, सामूहिक योजना, वैयक्तिक लाभार्थी योजना, जिल्हा परीषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत याच्या स्व उत्पन्नाच्या निधीतुन दिव्यांगांसाठी वापरला जातो. तो निधी किल्ले धारूर येथील सर्व ग्रामपंचायतींनी वाटप केलेला नाही. त्यामुळे प्रहारचे जिल्हासरचिटणीस तथा ता.अध्यक्ष हनुमंत तोंडे दि.१४-८-२०२५ रोजी अन्नत्याग उपोषण तहसिल कार्यालय किल्ले धारूर येथे करणार आहेत. या अन्नत्याग उपोषणास आझाद क्रांती सेना च्या वतीने पाठिंबा देण्यात आला. त्यावेळी प्रहारचे विष्णू चोले, बापू सिरसठ, अशोक ईगोंले, सुशांत थोरात, आझाद क्रांती सेना ता.अध्यक्ष बळीराम मस्के, मनोज इचके, धर्मा हजारे, अनंत वाघमारे, मनोज वाघमारे आदी उपस्थीत होते.

# तिरंग्यासह ४०० कि.मी.ची सायकल यात्रा; देशप्रेमाचा संदेश देत तिघांची ऐतिहासिक कामगिरी

**कडा । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी उत्सवानिमित्त संपूर्ण देशभर तिरंगा फडकवून, रॅली काढून देशप्रेम जागृत करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. त्याचाच भाग म्हणून अहिल्यानगर येथील तीन समाजप्रेमी नागरिकांनी तिरंगा ध्वज सायकलींना लावून अहिल्यानगर ते पंढरपूर असा ४०० किलोमीटरचा प्रवास अवघ्या ३५ तासांत पूर्ण करून अनोखा संदेश दिला.या तिरंगा सायकल रॅलीत सहभागी झालेले तिघे - जनार्धन दाजीबा गीते (वय ५८, सेवानिवृत्त कर्मचारी, कायनेटिक कंपनी), प्रा. डॉ. रामकृष्ण गहिनीनाथ बोडखे (वय ५५, इतिहास विभाग प्रमुख, आनंदराव धोंडे उर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, जि. बीड) आणि मेजर रावसाहेब लक्ष्मण कातोरे (वय ५०, सेवेनंतरही आर्मीमध्ये कार्यरत) यांनी हा प्रेरणादायी उपक्रम राबविला.

१४ ऑगस्ट रोजी पहाटे ४ वाजता अहिल्यानगर येथून सायकल प्रवासाची सुरुवात झाली. मिरजगाव, करमाळा मार्गे कुरकुम होत पंढरपूर येथे पोहोचून विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन दुपारी परतीचा प्रवास सुरू केला. अवघ्या एका दिवसात तब्बल २५० किलोमीटरचे अंतर पूर्ण करून पावसामुळे कुरकुमजवळ मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ५.३० वाजता प्रवास सुरू करून दुपारी ३ वाजता पुन्हा अहिल्यानगर येथे पोहोचले.

या रॅलीतून तिघांनी समाजाला स्पष्ट संदेश दिला की - सायकल चालवणे केवळ देशप्रेमाची जाणीव करून देत नाही तर आरोग्य सुधारते, प्रवासाचा खर्च कमी होतो आणि पर्यावरण प्रदूषणावर नियंत्रण मिळते. जगभरातील प्रगत देशांत सायकल वापराचे प्रमाण मोठे असून भारतातही सर्वांनी यापासून प्रेरणा घ्यावी असे त्यांनी आवाहन केले. अशा प्रकारे स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने या तिघांनी देशप्रेमाचा संदेश समाजाला देण्याचा प्रयत्न केला.



## तहसील कार्यालय बांधकामातील अनियमिततेविरोधात

# वंचितचे ‘फुले वाहा आंदोलन - भाग २’

**बीड । प्रतिनिधी**

तहसील कार्यालय बीडच्या नवीन इमारतीचे बांधकाम अंदाजपत्रक व नियमांप्रमाणे न होता, अत्यंत धीम्या गतीने सुरू असून गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीकडून करण्यात आला आहे. या प्रकरणी जबाबदार मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांच्या विरोधात ‘फुले वाहा आंदोलन - भाग २’ हाती घेण्यात आले.




वंचितच्या नेत्यांनी आंदोलनात मांडलेले प्रमुख मुद्दे असे - टेंडर प्रक्रियेत फक्त ३ एजन्सींना संधी; कमी स्पर्धेमुळे शासनाला लाखो रुपयांचे नुकसान सखोल चौकशीची मागणी अंबाजोगाई येथील विनायक कन्स्ट्रक्शनला १८० कोटींची कामे मिळाल्याबाबत पारदर्शक ई-निविदा प्रक्रियेची तपासणी क्वालिफिकेशन निकष तपासणीतील त्रुटी; वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे. राजकीय हस्तक्षेपाचा संशय; स्वतंत्र चौकशीची मागणी. एचऊ रक्कम व हस्तांतरण प्रक्रियेत संदिग्धता; पारदर्शक तपासणी आवश्यक. जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयासाठी गरज नसतानाही राफ्टचा समावेश; मतिपरीक्षणाची मागणी आंदोलनावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, ज्ञानेश्वर कवठेकर, सचिन मेगडबर, किरण वाघमारे, शहराध्यक्ष लखन जोगदंड, मिलिंद सरपते, आकाश साबळे, प्रेम कांबळे, युनुस शेख जंजाळ सर, रोहन मगर, प्रकाश उजगरे, कुमार साबळे यांच्यासह तालुका व शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



प्रभाग क्रमांक ९ शाहुनगर मधील रस्ते व नालीचे बोगसगिरी करून काम न करता बिल उचल्या प्रकरणात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन द्वारा संबंधित कन्ट्रक्शन वर कारवाई करुन काळ्या यादीत टाकण्यात यावा व कारवाई करण्यात यावी म्हणून तक्रार केली. निवेदन सोबत कामाचे कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक, तर चइ बिलाची कागदपत्र व काम न केलेल्या रोडचे फोटो सुद्धा जोडली आहेत बघु आता काय कारवाई करतात मा ना अजित दादा पवार साहेब....?

# सुरज भैयांच्या संकल्पनेतून साकारले पंकजाताईंचे तैलचित्र!

## महाकुंभ मधील अवस्मरणीय क्षणातील तैलचित्र पाहुन ताईसाहेब भारावल्या सुरज घुलेंनी दिलेल्या अनमोल भेटीचे पंकजाताईंनी केले कौतुक

**केज । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे प्रयागराज येथील महाकुंभ मेळ्यातील सहभाचा अवस्मरणीय तेजस्वी क्षणा ला मुर्तस्वरूप देण्याची संकल्पना ताईंचे खंदे समर्थक सुरज भैय्या घुले यांनी मांडल्या नंतर सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांनी प्रत्यक्षात पंकजाताई यांचे तैलचित्र हुबेहूब साकारले. हे तैलचित्र सुरज भैय्यानी पंकजाताई यांना मुंबई येथील त्यांच्या सरकारी बंगला रामटेक येथे भेट दिल्यानंतर अक्षरशः ताईसाहेब भारावून गेल्या. तसेच सुरज घुलेंनी दिलेल्या या अनमोल भेटीचे पंकजाताई मुंडे यांनी कौतुक केले.

दिल्लीतील सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांच्याद्वारे ही पेंटिंग बनवण्यात आलेली आहे. महेश पंडित यांनी मा.राष्ट्रपती रामनाथ कोविंदजी, पंतप्रधान नरेंद्र मोदीजी, गृहमंत्री अमित भाई शहा, अरुण जेटली अशा अनेक नेत्यांच्या पेंटिंग्स बनवलेल्या आहेत. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचा प्रयागराज येथील महाकुंभ दरम्यानचा फोटो या पेंटिंगसाठी निवडण्यात आला होता. ही पेंटिंग ६ फुट उंच व ४ फुट रुंद आहे. पेंटिंग तयार करण्यासाठी कलाकारांना तब्बल दोन महिन्यांचा कालावधी लागला.

या पेंटिंगची संपूर्ण संकल्पना केज येथिल भाजपचे युवा नेते सुरज भैय्या घुले यांची होती. त्यांनी १३ ऑगस्ट २०२५ रोजी रामटेक, मुंबई येथे मंत्री ना. पंकजाताई मुंडेना ही पेंटिंग भेट म्हणून दिली. भेटी दरम्यान महत्त्वाच्या विषयांवर मंत्री ना.पंकजाताई मुंडेशी सुरज भैय्या घुले यांची चर्चा झाली.

### सुरज भैय्या घुले यांची संकल्पना; मंत्री पंकजाताई मुंडेनां झाला आनंद

तैलचित्र फ्रेम तयार करून सुरज भैय्या घुले यांनी ना.पंकजाताइ मुंडे यांच्या निवासस्थानी जाऊन भेट दिला. प्रयागराज' येथील महाकुंभ दरम्यान फोटोचे तैलचित्र सुप्रसिद्ध चित्रकार महेश पंडित यांनी हुबेहुब साकारल्याबद्दल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी चित्रकार महेश पंडित यांचे फोनवर बोलून कौतुक केले. इतकंच नाही तर हे तैलचित्र त्यांनी तातडीने त्यांच्या बंगल्यात लावलंही तसेच ना.पंकजाताई मुंडेनी महत्वाच्या विषयावर बोलण्यासाठी खास राखून वेळ दिल्याबद्दल त्यांचे आभार सुरज भैय्या घुले यांनी व्यक्त केले.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT